संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

## विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता पदी डॉ.एफ.सी. रघुवंशी रुजु

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या कायम अधिष्ठाता पदी डॉ.एफ.सी. रघुवंशी यांनी आज अधिष्ठाता पदाचा पदभार स्वीकारला. त्यांची कायम अधिष्ठाता म्हणून नियुक्ती झाली आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी यांचे पुस्तक देवून स्वागत केले. यावेळी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, व्य.प. सदस्य डॉ. प्रदीप खेडकर, डॉ. प्रफुल्ल गवई, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.डी.डब्ल्यु. निचित, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे, रा.से.यो. प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, अधिसभा सदस्य डॉ. मनिष गवई, कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, उपकुलसचिव (लेखा) डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव (भांडार) डॉ.डी.आर. चव्हाण, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच अधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

डॉ.एफ.सी. रघुवंशी यांनी प्राचार्य म्हणून सलग दहा वर्षे विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथे कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ९ विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी संपादन केली असून ४ विद्यार्थी सध्या संशोधन करीत आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट राज्य शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांचे ८४ शोधनिबंध नामांकित जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहे. १४ आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये, तर ७२ राष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांचा सहभाग राहीला असून ३ आंतरराष्ट्रीय परिषदांचे व १५ राष्ट्रीय परिषदांचे संयोजक म्हणून आयोजन केले आहे. याशिवाय अमेरिका, मलेशिया, जपान व चीन देशांना त्यांनी शैक्षणिक भेटी दिल्या आहेत.

यापूर्वी त्यांनी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, अधिसभा, विद्वत परिषदेचे सदस्य म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे, यशवंतराव महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सल्लागार समितीवर ते सन्माननीय सदस्य म्हणून आहे. याशिवाय त्यांची ७ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ.एफ.सी. रघुवंशी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

---

प्रति,                                                                                 **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी                                                 दि. २०/०५/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी